**उमरेड येथील न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी — न्यायालय क्र. २ यांचे न्यायालयातील फौजदारी प्रक्रिया संहिता प्रकरण २१ कलम २६३ प्रमाणे संक्षित संपरिक्षा मधील अभिलेख**

**आरोपीचे विवरण**

**सं.फौ.ख.क्र.१८४/२०२१**
**नि.क्र.०९**

१. अपराध घडल्याचा दिनांक : १८.१२.२०२०

२. फिर्याद दाखल तारीख : १९.१२.२०२०

३. फिर्यादीचे नांव व पत्ता : टिकाराम मोतीरामजी कडसकर, रा.चनोडा,ता.उमरेड,जि.नागपूर.

४. आरोपीचे नांव व पत्ता : लोकेश सुधाकर मुळे, वय:२२ वर्ष, व्यवसाय:ऑटो चालक राहणार:चनोडा, ता.उमरेड, जि.नागपूर.

५. आरोपाचा आशय :

ज्याअर्थी तुम्ही दिनांक १८.०२.२०२०रोजी सायंकाळी ६.३० वाजताचे दरम्यान उमरेड येथुन चनोडा येथे येण्याकरीता परत निघालेले असता तुमचे वाहन ॲटो क्र.एम.एच.४०,२१७१ ने मानवी जिवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोचविण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवले आणि त्याद्वारे आपण **भा.द.वी.कलम २७९** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाचे दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीने तुमचे वाहन ॲटो क्र.एम.एच.४०,२१७१ ने मानवी जिवित धोक्यात येईल इतक्या भरधाव वेगाने, बेदरकारपणे व हयगयीने चालवून ॲटोमध्ये बसलेल्या लोकांना दुखापत पोहचविली व त्यायोगे तुम्ही **भा.द.वी.कलम ३३७** अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला आहे.

उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीने तुमचे वाहन ॲटो क्र.एम.एच.४०,२१७१ ने मानवी जिवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवून, अशा प्रकारे सदोष मुनुष्यवधाचे सदरात न मोडणारी बेदरकार किंवा हयगयीची कृती करून, उक्त नमूद आरोपी चालकाने त्याच्या ॲटोमध्ये बसलेल्या सौ.भारती खुशालराव कडसकर यांना गंभीर दुखापत पोहचवुन त्यांचे मृत्युस कारणिभूत ठरला आणि याद्वारे आपण भारतीय दंड संहिताचे **कलम ३०४—अ** खाली

शिक्षापात्र आणि या न्यायालयाचे दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

उपरोक्त नमुद वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीने तुमचे वाहन ॲटो क्र.एम.एच.४०,२१७१ इतरांचे जिवितास धोका निर्माण होईल अशाप्रकारे चालवली आणि याद्वारे आपण **मोटार वाहण अधिनियमाचे कलम १८४** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाचे दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

आणि मी याद्वारे असा निर्देश देतो की, उक्त नमुद दोषारोपांवरून आपली या न्यायालयाद्वारे संपरिक्षा करण्यात यावी.

(आर.एस.मानकर)

दि.१४.०१.२०२५

२ रे सह न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड